NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २८.१०.२०२६ बुधवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २७.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून एकुण ९००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये १२ ईसमांवर कारवाई करून एकुण ५,७५५/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दिनांक २७.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २८.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ५४ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ११३ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २७३ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ७७ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ७९ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ६७ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ९७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०५ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २२ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये १३ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१०१ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये १३ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १९ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,१२७ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ७,७४,४५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :– जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस

दिनांक २१.१०.२०२६ चे १५.०० वा. ते १५.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी श्रीमती स्नेहा गणेश खिरडकर, वय २७ वर्षे, रा. दिघोरी, न्यु नरसाळा, मुळजाई नगर, गारगोटी, हुडकेश्वर, नागपुर ह्या बस क्र. एम. एच ४० डि.सी. ०४६४ या बसवर कन्डक्टर पदाचे कर्तव्यावर ब्राम्हणी फाटा ते सिताबर्डी येथे जात असतांना, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत काटोल रोड, आदीवासी नर्मदा कॉलोनी बसस्टॉप येथुन एक २१ ते २५ वर्षे वयाचा मुलगा नविन काटोल नाका जायचे म्हणुन बसमध्ये बसला. त्याने फिर्यादीस २०/–रू. देवुन तिकिट काढली. फिर्यादीने त्यास १६/–रू. ची तिकीट देवुन, ४/–रू. चिल्लर नसल्याने थोड्या वेळाने देते असे

सांगीतले. नर्मदा कॉलोनी बसस्थानकावर बस थांबल्यावर फिर्यादी यांनी बसचा दरवाजा उघडला असता, नमुद मुलाने फिर्यादीचे हातातील तिकीट काढण्याची मशीन किंमती १०,०००/—रू. ची जबरीने हिसकावुन पळुन गेला होता. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपींविरूध्द कलम ३०४(१) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. ०२ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व खात्रीशीर माहीतीवरून सापळा रचुन आरोपी नामे प्रेम उर्फ दादु विजय पाटील, वय २० वर्षे, रा. भिवसनखोरी, चिंतामण नगर, गिट्टीखदान, नागपुर यास पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतुन ताब्यात घेवुन त्यास गुन्हे संबंधाने विचारपूस केली असता, त्याने वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यातील काळ्या व केसरी रंगाची टिकीट काढण्याची मशीन किंमती अंदाजे १०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि. चेतन बोरखडे, पोउपनि. मनोज राऊत, पोहवा. महेंद्र सडमाके, नरेश तुमडाम, अर्जुन यादव, मनिष टोंगे, पोअं. संदीप पांडे, व किशोर पालवे यांनी केली.



<u>३) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— वाहन चोर आरोपीस अटक, एकुण ०५ गुन्हे उघडकीस.</u>

दिनांक ०५.१०.२०२६ चे ०१.०० वा. ते ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत मेहंदीबाग पॉवर हाऊस, शिवमंदीर समोरील, आमरे चे घरी किरायाने राहणारे फिर्यादी मनिष संतोष तिवारी, वय २२ वर्षे यांनी त्यांची बजाज पल्सर मोटारसायकल क्र. एम.एच ४९ ए.जी ६०४३ किंमती ४०,०००/—रू. ची, राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून, ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात, यशोधरानगर पोलीसांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी नामे कन्हैय्या उर्फ सोनु रामभुवन शाहु, वय १९ वर्षे, रा. नविन शितलामाता मंदीरजवळ, विजय नगर, कळमना, नागपुर यास ताब्यात घेवुन, नमुद गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहनचोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन ०१ होंडा युनिकॉर्न क्र. एम.एच २९ ए.यु ४७०७ किंमती १,००,०००/—रू., तसेच, पोलीस ठाणे सदर हद्दीतुन होंडा डिओ मोपेड क्र. एम.एच ३१ ई.एल ९४४४ किंमती ९०,०००/—रू., पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतुन पल्सर दुचाकी क्र. एम.एच ३१ एफ.एन ०१६९ किंमती १,००,०००/—रू.

असे एकुण ०४ वाहन चोरी व पोलीस ठाणे कोराडी हद्दीत एक घरफोडी केल्याची कबुली दिली. आरोपीकडुन एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणलेले असुन, त्याचे ताब्यातुन एकुण ०४ दुचाकी वाहने ३,३०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असुन, पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. युनुसचॉद शेख, दुपोनि. विवेकानंद भारती, पोउपनि. अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंदरे, अशोक तायडे, पोअं. मनिष झरकर, संदीप वानखेडे, शितेष चौरसिया, भुषण येरोजवार व प्रविण ईनवाते यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे राणाप्रताप नगर :— हद्दपार ईसमास अटक.

दिनांक २७.१०.२०२६ चे १८.०० वा. चे सुमारास, राणाप्रताप नगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, प्रज्ञाशिल बुध्दविहार जवळ हद्दपार इसम नामे सुरज हातीबेंड बसलेला आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम बसलेला दिसुन आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जावु लागला. त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव सुरज कैलास हातीबेंड, वय ३० वर्षे, रा. प्रज्ञाशिल बुध्द विहार जवळ, सुभाषनगर, राणाप्रताप नगर, नागपुर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३८६७/२०२४ दिनांक २८.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. संतोष सोनटक्के यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे पोहवा. निलेश तारायकर यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे वाठोडा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २७.१०.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे नातेवाईक नामे प्रविणकुमार योगराज वालदे, वय २७ वर्षे, रा. गाव कान्होली, आधारनगरी, डोंगरगांव जवळ, वर्धा रोड, नागपुर हे त्यांची आजी मरण पावल्याने, त्यांचे मित्रासोबत मोटारसायकल क्र. एम.एच. २९ सि.एस ९८१० ने पानगांव, गोंदीया येथे अंत्यविधी करीता गेले होते. परत येत असता, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, जबलपुर—हैदराबाद आऊटर रिंगरोड हायवे,

पांढुर्णा गावाजवळील साईयोग वाशिंग सेंटर अॅण्ड लॅण्ड डेव्हलपर्स समोरील रोडवर ट्रक क्र. सि.जी १० ए.डब्ल्यु ५३११ चा चालक नामे धर्मेंद्रकुमार शालीकराम चौरसिया, वय ३० वर्षे, रा. बडी मदारी, पोस्ट सिसुआ, जि. प्रयागराज (उत्तरप्रदेश) याने त्याचा नादुरूस्त ट्रक बंद अवस्थेत धोकादायकरित्या चुकीच्या पध्दतीने रत्यावर उभा करून ठेवल्याने फिर्यादीचे नातेवाईकास अंधारात ट्रक न दिसल्याने ते ट्रकला धडकुन गंभीर जखमी होवनु, जागीच मरण पावले. तसेच, त्यांचा मित्र नामे सौरभ तोडासे, वय २० वर्षे, रा. माटेगांव कळंब, जि. यवतमाळ यांनासुध्दा मार लागुन ते गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी यांचा उपचार मेडीकल हॉस्पीटल येथे सुरू आहे.

मृतकाचे मृत्युस ट्रकचालक आरोपी कारणीभुत आहे. अशा फिर्यादी लुमेश सुधाकर जांभुळकर, वय २५ वर्षे, रा. गाव कान्होली, आधारनगरी, डोंगरगांव जवळ, वर्धा रोड, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. प्रविण राऊत यांनी ट्रकचालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १२२ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे बजाजनगर :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २२.१०.२०२६ चे १३.३० वा. ते दिनांक २६.१०.२०२६ चे १६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत प्लॉट नं. ४, सुरेंद्र नगर, एसबीआय बॅकजवळ, नागपूर येथे राहणारे फिर्यादी डॉ. अतुल केशवराव कापसे, वय ४० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह भुवनेश्वर (ओडीसा) येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २५,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने, कॅमेरा, घड्याळ, अॅपल कंपनीचा लॅपटॉप चार्जर असा एकुण किंमती ७,१६,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे सफौ. सुरजकुमार मिश्रा ९३७१२४७८४२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे बेलतरोडी :– पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट नं. २७८, सेक्टर नं. २३४, शिवनगांव पुनर्वसन चे समोरील बकरीचे टिनाचे शेडमध्ये एक भुऱ्या नावाचे ईसम वय अंदाजे ४० वर्षे वयाचे, मागील १० वर्षापासुन राहत होते व मिळेल ती कामे करीत होते. दिनांक २७.१०.२०२६ चे २१.०० वा. चे सुमारास, ते नमुद ठिकाणी बेशुध्द व आजारी अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान दिनांक २८.१०.२०२६ चे ००.२२ वा. चे सुमारास, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे बेलतरोडी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी कु. श्वेता परबत गणविर, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. २७८, सेक्टर नं. २३४, शिवनगांव पुनर्वसन, बेलतरोडी, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मपोउपनि. सुकन्या चौधरी यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.